# ‘कलेतून श्रद्धांजली हा आगळावेगळा उपक्रम’

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) – श्रद्धांजलीचे अनेक कार्यक्रम होत असतात. मात्र, एकपात्री कलाकार परिषदेच्या कॉमेडी मेकर्स कलेतून श्रद्धांजली वाहण्याचा हा आगळा-वेगळा उपक्रम आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांनी व्यक्त केले.

एकपात्री कलाकार परिषदेतर्फे ‘नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांना कार्यक्रम स्वरूपात श्रद्धांजली’ या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. एकपात्री कलाकार परिषदेच्या अध्यक्षा चैताली माजगावकर-भंडारी, उपाध्यक्ष विजय कोटस्थाने, श्रीप्रकाश सप्रे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी चैताली माजगावकर-भंडारी यांनी ‘गंमत-जंमत’, विजय कोटस्थाने आणि अंजली शहा यांनी ‘दूरदर्शन’, श्रीप्रकाश सप्रे यांनी ‘सप्रेम नमस्कार’, विश्वास पटवर्धन आणि यांनी ‘स्वभाव राशींचे’, दिलीप हल्ल्याळ आणि मृदला मोघे यांनी ‘असा नवरा’ असे एकपात्री कलेचे सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली.

देशपांडे म्हणाल्या, नटवर्य भालचंद्र पेंढारकर हे खूप मोठे कलाकार होते. त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली नसली, तरी सहवास लाभला. एकट्याने प्रेक्षकांना खिळवून ठेवणे अवघड गोष्ट आहे. एकपात्री कला सादरीकरण कठीण असल्याचे त्यांनी सांगितले.